# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः10.04.2024** **वारःबुधवार**

---

1. होमिओपॅथी परीषदेचं आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते उद्घाटन
2. पंतप्रधान नरेंद्र मोदींची आज महाराष्ट्रात रामटेक मतदारसंघात प्रचारसभा
3. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा लोकसभा निवडणुकीत महायुतीला बिनशर्त पाठिंबा
4. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, कावीळ हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा जीवघेणा आजार णि
5. छत्तीसगडमध्ये रस्ता अपघातात 12 जणांचा तर बिहारमध्ये आगीत सात जणांचा मृत्यू

**होमिओपॅथी परिसंवाद**

राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू आज नवी दिल्लीत आज होणाऱ्या दोन दिवसीय होमिओपॅथी परिसंवादाचे उद्घाटन करतील. होमिओपॅथी क्षेत्रातील संशोधन अधिक सक्षम करणे आणि त्यातील प्रविण्याला चालना देणे ही या परिसंवादाची मध्यवर्ती संकल्पना आहे. जागतिक होमिओपॅथी दिनानिमित्त केंद्रीय होमिओपॅथी संशोधन परिषदेने आयुष मंत्रालयाच्या सहकार्याने या परिसंवादाचं आयोजन केलं आहे. होमिओपॅथीतल्या संशोधनासाठी अत्याधुनिक तंत्राचा वापर करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे, तसंच निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन देणे ही या परिसंवादाची प्रमुख उद्दिष्टे असतील. आयुष मंत्रालयाचे सचिव वैद्य राजेश कोटेचा, केंद्रीय होमिओपॅथी संशोधन परिषदेचे महासंचालक डॉ. सुभाष कौशिक, राष्ट्रीय होमिओपॅथी समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल खुराना आणि या विषयातील पद्म पुरस्कारार्थी या कार्यक्रमात सहभागी होतील.

**पंतप्रधान रामटेक**

पंतप्रधान आणि भाजपाचे वरीष्ठ नेते नरेंद्र मोदी यांची आज महाराष्ट्रात नागपूर जिल्ह्यातल्या रामटेक इथं प्रचारसभा होणार आहे. रामटेक लोकसभा मतदार संघातून शिवसेना शिंदे गटाचे राजू पारवे हे महायुतीचे उमेदवार आहेत. नागपूरमधून केंद्रिय मंत्री नितीन गडकरी लोकसभा निवडणूक लढवत आहेत. महाआघाडीतर्फे काँग्रेसचे श्याम बर्वे हे रामटेकमधले आणि विकास ठाकरे नागपूरचे उमेदवार आहेत. वंचित बहुजन आघाडीनं दोन्ही ठिकाणी काँग्रेसच्या उमेदवारांना पाठिंबा दिला आहे. दरम्यान, बहुजन समाज पार्टीच्या अध्यक्ष मायावती उत्तर नागपूरमधल्या इंदोरा इथं उद्या जाहीर सभा घेतील. बसपातर्फे नागपूरमधून योगेश लांजेवार आणि रामटेकमधून संदीप मेश्राम निवडणुकीच्या रिंगणात आहेत. नागपूर आणि रामटेकसह विदर्भातल्या पाच लोकसभा मतदारसंघात येत्या 19 एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

**मनसे महायुती**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी काल लोकसभा निवडणुकीत महायुतीला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला. गुढीपाडव्यानिमित्त झालेल्या मनसेच्या वार्षिक मेळाव्यात ते बोलत होते. नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान व्हावेत यासाठी आपल्या पक्षानं बिनशर्त पाठिंबा देऊ केल्याचं राज ठाकरे म्हणाले. त्यामुळे मनसे महाराष्ट्रात लोकसभा निवडणूक लढवणार नाही आणि सत्ताधारी पक्षाच्या उमेदवारांना मदत करणार असल्याचं आता स्पष्ट झालं आहे.

**कंपन्या**

लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगालमधे केंद्रिय सशस्त्र निमलष्करी दलाच्या आणखी शंभर तुकड्या तैनात करण्याचे आदेश निवडणूक आयोगानं दिले आहेत. त्यानुसार केंद्रिय गृह मंत्रालय केंद्रिय राखीव पोलिस दलाच्या 55 आणि सीमा सुरक्षा दलाच्या 45 तुकड्या राज्यात तैनात करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. येत्या सोमवारपूर्वी हे काम पूर्ण करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

**<u>केजरीवाल</u>**

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची सक्तवसूली संचालनालय अर्थात इडीनं केलेल्या अटकेला आव्हान देणारी याचिका काल दिल्ली उच्च न्यायालयानं फेटाळली. मद्य धोरणातल्या कथित घोटाळ्यासंदर्भात इडीनं केजरीवाल यांना ताब्यात घेतलं होतं. इडीनं सादर केलेले पुरावे आणि आम आदमी पक्षाच्याच एका नेत्यानं दिलेला गोवा निवडणूकीदरम्यान केजरीवाल यांना पैसे मिळाल्याचा जबाब न्यायालयानं ग्राह्य धरला. दरम्यान, निवडणुका तोंडावर असताना अटक केल्याच्या केजरीवाल यांच्या मुद्द्यावर अटकेच्या वेळेला आव्हान दिलं जाऊ शकत नाही असं न्यायलयानं म्हटलं आहे. केजरीवाल सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

**<u>कावीळ मृत्यू</u>**

2024 साली जारी करण्यात आलेल्या, जागतिक आरोग्य संघटनेच्या, जागतिक काविळ अहवालानुसार, कावीळ संसर्गामुळे होणाऱ्या मृत्यूंच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. कावीळ संसर्गामुळे जगभरात दर दिवशी 3500 मृत्यू होत असून, जगभरात दरवर्षी 10 लाखांहून अधिक मृत्यू होत असल्याचंही आरोग्य संघटनेच्या या अहवालात नमूद करण्यात आलं आहे. हा मृत्युदर पाहता, आगामी काळात कावीळ संसर्ग रोखण्यासाठी ठोस पावले उचलण्याची गरज जागतिक आरोग्य संघटनेने व्यक्त केली आहे. त्यामुळे मृत्यूचे कारण ठरणारा कावीळ हा दुसऱ्या क्रमांकाचा संसर्गजन्य आजार ठरला आहे.

**<u>तटरक्षक दल</u>**

भारतीय तटरक्षक दलाचं प्रदूषण नियंत्रण जहाज समुद्र पहरेदार, काल ब्रुनेईच्या मुआरा बंदरात पोहोचलं. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी 2022 मध्ये समुद्रातील प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी आसिआन संघटनेच्या सदस्य देशांसोबत एक उपक्रम सुरू केला होता. या उपक्रमाच्या अनुषंगानं तटरक्षक दलाचं हे विशेष जहाज तीन दिवसांच्या आसिआन देशांच्या दौऱ्यावर रवाना झालं आहे.

**<u>तरुण बजाज</u>**

अमेरिका भारत धोरणात्मक आणि भागीदारी मंचाने माजी महसूल सचिव आणि अर्थ व्यवहार मंत्रालयाचे माजी सचिव तरुण बजाज यांची अमेरिका भारत कर मंचाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याची घोषणा केली आहे. बजाज यांनी भारत सरकारसोबत काम करत असताना देशाची वित्तीय धोरणं ठरवण्यात आणि आर्थिक वाढीला चालना देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे, असे गौरवोद्गार यावेळी मंचाने काढले.

**<u>पावडिया नियुक्ती</u>**

आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ नियंत्रण मंडळाच्या सदस्यपदी भारताकडून जगजित पावडिया यांची पुन्हा एकदा निवड झाली आहे. या निवडणुकीत सर्वाधिक मते भारताला मिळाली आहेत, असं सांगत परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी त्यांचे आणि मंत्रालयाच्या गटाचं अभिनंदन केलं आहे. 2024-30 या कालावधीसाठी पावडिया यांची निवड झाली असून 2024-22 मध्ये त्यांनी या मंडळाचं अध्यक्षपदही भूषवलं होतं.

**<u>स्टार्टअप</u>**

भारतानं युरोपिय संघासोबत स्टार्ट अप सहकार्याला चालना देण्यासाठी काल एक उपक्रम सुरू केला. या अंतर्गत व्यापार आणि तंत्रज्ञान मंडळातर्फे इलेक्ट्रीक वाहनांमधल्या बॅटरीच्या पुनर्वापराबाबत युरोप आणि भारतातल्या लघु तसंच मध्यम उद्योग, स्टार्ट अप्समधे स्वच्छ, हरित ऊर्जा क्षेत्रात सहकार्य केलं जाणार आहे. याद्वारे होणारी माहिती आणि ज्ञानाची देवाणघेवाण दुर्मिळ धातूंचा पुनर्वापर तसंच कार्बन उत्सर्जनाचं प्रमाण कमी करण्यात महत्त्वाची ठरणार आहे.

**<u>छत्तीसगढ अपघात</u>**

छत्तीसगढमध्ये काल संध्याकाळी चालकाचं नियंत्रण सुटल्यामुळे बस दरीत कोसळून 12 जणांचा मृत्यू झाला तर 15 प्रवासी जखमी झाले आहेत. हे सर्वजण कुम्हारीतल्या एका खासगी कारखान्यात काम करत होते आणि कामावरून घरी परतत असताना खापरी गावाजवळ हा अपघात झाला.

**बिहार आग**

बिहारच्या रोहतस जिल्ह्यातल्या इब्राहिमपूर भागात काल दुपारी झोपडीला लागलेल्या आगीत सात जणांचा मृत्यू झाला. यामध्ये 5 लहान मुले आणि दोन महिलांचा समावेश होता. जवळच्या रोहित्रातल्या बिघाडामुळे गवताच्या झोपडीने पेट घेतल्याची माहिती स्थानिकांनी दिली. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**अमलीपदार्थ**

अटारी इथल्या अमली पदार्थ जप्तीप्रकरणातला प्रमुख आरोपी हरविंदर सिंग याला  राष्ट्रीय तपास यंत्रणा अर्थात एनआयए नं काल अटक केली. एप्रिल 2022 मधे सीमा शुल्क विभागानं अटारी सीमेवरुन सात हजार कोटी रुपये किमतीचं सुमारे 102 किलो हेरॉइन जप्त केलं होतं. अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीनं त्यावेळी भारतात विविध वितरकांच्या माध्यमातून अंमली पदार्थ पोहोचवण्याचा कट आखला होता.

**मालमत्ता ईडी**

पंजाब आणि महाराष्ट्र सहकारी बँक कर्ज घोटाळा प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाने 52 कोटी रुपयांची एक हजाराहून अधिक एकर जमीन ताब्यात घेतली आहे. या दोन्ही बँकांचे संचालक जॉय थॉमस, वार्यम सिंह आणि काही अज्ञातांविरोधात मुंबई पोलिसांनी दाखल केलेल्या प्राथमिक अहवालानंतर सक्तवसुली संचालनालयाने ही कारवाई केली आहे.

**हवामान-बदल**

हवामान संकट योग्यरित्या हाताळण्यात स्वित्झर्लंडला आलेलं अपयश सध्याच्या हवामान बदलाला कारणीभूत आहे आणि हे मानवाधिकारांचं उल्लंघन असल्याचा निर्णय फ्रान्समधल्या युरोपियन मानवाधिकार न्यायालयानं काल दिला. स्वित्झर्लंडमधल्या ज्येष्ठ महिलांच्या एका समुहानं न्यायालयात स्वित्झर्लंड सरकारविरोधात याचिका दाखल केली होती. स्वित्झर्लंडच्या अपयशामुळे उष्णतेच्या लाटेत आपला मृत्यू ओढवण्याची वेळ आली होती असं त्यांनी या याचिकेत म्हटलं आहे. त्यावरील सुनावणीवेळी मानवाधिकार न्यायालयानं हा निर्णय दिला.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.